## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७२५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/१०/२०१७

**१) लोखंडी रॉडने डोक्यावर मारून जिवाने ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २२/१०/२०१७ चे १५.४५ ते १६.०० वा. दरम्यान फिर्यादी आमना जाकीर शेख वय ५५ वर्ष रा. लाला लजपतराय वार्ड भंडारा हिचा मुलगा फिरोज जाकीर शेख वय ३२ वर्ष व आरोपी सोबत रिक्षाच्या भांडणाच्या कारणा वरून लोंखडी रॉडने फिर्यादीचे मुलाचे डोक्यावर मारून गंभिर जखमी करून जिवाने ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने, फिर्यादी हिचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३०७ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. खाडे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) कारच्या धडकेत एक जखमी :—**

दिनांक २२/१०/२०१७ चे १०.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन समोरून येणारी मोटार सायकल क्र. एमएच ३६ आर ३६१५ हीला धडक मारून मोटार सायकल चालक गंगाधर कुंभरे रा. मुंडीकोटा व मागे बसनारा कृष्णा काळसर्पे यास गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने ,चौकशी वरून सरतर्फे फिर्यादी पोउपनी. जाधव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी उबाळे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) मोटार सायकल निष्काळजीपणे चलवुन लोखंडी खांबाला धडक मारून जखमी झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २२/१०/२०१७ चे ००.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी रंजित बंडु नंदागवळी वय २६ रा. किन्ही मांढळ ही व जखमी हे लाखनी कडुन साकोली कडे एनएच ६ रोडने होंडा डिलक्स मोटार सायकल भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन रोडचे कडेला असलेल्या लोंखडी खांबाला धडक मारून, स्वत: जखमी झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७, भादवी सहकलम १८४, मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**४) ट्रॅक्टर वरुन डावे बाजुला उडी मारुन रोडवर पडुन मरण पावल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २२/१०/२०१७ चे १४.३० वाजता दरम्यान यातील ट्रॅक्टर क्र. एमएच ३५ जी ०९४३ चा चालक आरोपी मृतक प्रदीप नेपाल पंधरे वय ३० वर्ष, रा. मेंढा पोहरा हा ट्रॅक्टरचा मालक फिर्यादी हे अडयाळ येथुन ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये गिट्टी भरुन दोघेही सेलोटी येथे जात असतांनी ट्रॅक्टर चा चालक मृतक याने त्याचे ताब्यातील चालते ट्रॅक्टरवरुन डावे बाजुला खाली उडी मारल्याने तो रोडवर पडुन मरण पावला असे फिर्यादी बाजीराव दौलत दोनोडे वय ३६ रा. मेंढा पोहरा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३०४(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. पुसाटे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**५) अज्ञात मोटार सायकलच्या धडकेत दोन जखमी :—**

दिनांक २१/१०/२०१७ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सुनील रमेश डोंगरे वय ३४ वर्ष, रा. सुभाष वार्ड देव्हाडी हा त्याचा मित्र आकाश समर्थ वासनीक व योगेश मनोहर डोंगरे सोबत मोटार सायकलने पांलादुर कडुन देव्हाडी कडे रोडने जात असतांनी विरुध्द दिशेने येणाऱ्या यातील आरोपी अनोळखी मोटार सायकल चालकांनी त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणें चालवुन मोटार सायकलला धडक मारुन गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १३४,१८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेंपुजे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**६) सार्वजनीक ठिकाणी वाहन थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा व लोंकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २२/१०/२०१७ चे १७.०० ते १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन टाटा मॅजीक ही आम रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने, पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**७) गळफास लावुन युवकाचा मृत्यु. :—**

दिनांक २२/१०/२०१७ चे ०८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी प्रल्हाद नामदेव कुंभारे वय ४३ वर्ष, रा. राजेन्द्र वार्ड मोहाडी याचा मुलगा मृतक मयुर प्रल्हाद कुंभरे वय २२ वर्ष, रा. राजेन्द्र वार्ड मोहाडी हा त्याचे राहते घराजवळील जुन्या घरील मागील स्वयपांक खोलीचे फाटयाला सुती दोराने गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गेडाम पो.स्टे मोहाडी हे करीत आहेत.

**८) नहराचे पाण्यात बुडुन मरण पावल्याने इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक २१/१०/२०१७ चे २०.०० ते २२/१०/२०१७ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील मृतक फुलचंद दिना ठाकरे वय ६२ वर्ष, रा. टेंभनी हा दिनांक २१/१०/२०१७ चे रात्रीला २०.०० वा. दर घरी कोणाला काही न सांगता घरुन निघुन गेला व दिनांक २२/१०/२०१७ चे ०६.०० वा. दर. फिर्यादी मृतकचे जावई व मृतक चा मुलगा यांनी शोध शोध केली असता मृतक हा चांदपुर तलावाचे नहराचे पाण्यात बुडुन मरण पावलेल्या स्थितीत मिळुन आल्याने फिर्यादी घनश्याम फंदु शहारे वय ३५ वर्ष, रा. गोंडी टोला यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो.स्टे सिहोरा हे करीत आहेत.

**९) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक २२/१०/२०१७ चे १३.०० वाजता दरम्यान यातील मृतक संदीप संभजी चुटे वय ३० वर्ष, रा. विरली बु. घरी कोणीही हाजर नसतांनी दारु पाणी पिऊन दारुचे नशेत स्वत:चे घरातील स्वयंपाक खोलीत आडयाला दुपटयाने गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी शंकर नत्थुजी चुटे वय ४१ वर्ष, रा. विरली बु. यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ऊके पो.स्टे लाखांदुर हे करीत आहेत.

**१०) अवैध दारू अंडयावर धाडी . :–**

दिनांक २२/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन वरठी व अडयाळ येथे अवैध दारू अंडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून ५० लिटर हातभट्टी दारू किंमती ४६००/–रु, चा माल जप्त करण्यात आला.

(पो.नि.एस.टी.घुसर )
**पो.नी.स्था.गु.शा भंडारा**
दुरध्वनी.क्र. ८८०५६१९१९१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.